**नि. फौ. ख. क्र.४६६/२०२१**

सरकार वि. संतोष भरणे,

**नि.क्र. २७**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी</u>**

मी शपथेवर कथन करतो की,

**<u>माझे नाव– निखील नागनाथ गुंड ,</u>**

वय–३० वर्षे, नेमणूक – वनरक्षक,

रा. माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर.

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एन. पी. कुचेकर, यांचेमार्फत शपथेवर सुरु –</u>**

दि.३१/०३/२०१९ रोजी मी वनरक्षक या पदावर कळस, ता.इंदापूर येथे कार्यरत होतो. त्या दिवशी मौजे लासुर्णे येथे फॉरेस्ट गट नं.७२८ मध्ये फिरती करत असताना आरोपी संतोष मच्छिंद्र भरणे व इतर दोन यांनी पाईपलाईन करण्याच्या उद्देशाने वनक्षेत्रामध्ये ३३५ मीटर लांबीची १ ते २ मीटर रूंद चारी खांदून तीन पाईपलाईन काढून वन गुन्हा केला. त्याबद्दल मी वन गुन्हा नोंदविला. घटनेची हकीकत वरिष्ठांना कळविली. आता मला मी दिलेली पी.ओ.आर. दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.२८</u>** देण्यात येते. त्याच आरोपींनी दि.२८/०१/२०२० रोजी गट नं.२२७ मध्ये पुन्हा १२६ मीटर लांबीची १ ते २ मीटर रूंदीची चार खोदून तीन पाईपलाईन खोदकाम केले. म्हणून मी गुन्हा नोंदविला. आता मला मी दिलेली पी.ओ.आर. दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.२९</u>** देण्यात येते. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर नाहीत.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे श्री.डी.डी.सांगळे, विधीज्ञ यांचेमार्फत –</u>**

२. इंदापूर तालुक्यात ब–याच गावांना लागून वनक्षेत्र आहे. हजारो शेतक–

याच्या पाईपलाईन वनक्षेत्रातून गेल्या आहेत का कसे मला सांगता येणार नाही. मी प्रत्यक्ष जमीन खोदताना पाहिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, पाईपलाईन आरोपींचीच आहे याची स्थानिकाकडे चौकशी केली नाही. मी स्थानिक लोकांचा जबाब नोंदविला नाही. पाईपलाईन आरोपींचीच आहे याचा कागदोपत्री पुरावा दोषारोपपत्रात दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी वनक्षेत्रात पाईपलाईन केल्याचे मी खोटे सांगत आहे. पाईपलाईनवर विशिष्ट खूण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरून आरोपींवर खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-
**( ए. बी. पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**दि.०१/११/२०२५**